MAHBIL03429/13/1/2000-TC    खाजगी वितरणासाठी    वर्ष: आठवे । अंक: आठवा । डिसेंबर, २००८

# CIDCO Nirmiti
A NEWSLETTER






09 नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय व्यापार मेळयात सिडकोच्या स्टॉलला उत्तम प्रतिसाद
12 Ex. President Hon. Dr. A. P. J. Abdul Kalam consulted for Science Park project
13 विशेष वैद्यकीय देयके : इंटरनेट आधारित सॉफ्टवेअर कार्यान्वित
14 श्री.श्यामसुंदर शिंदे सहव्यवस्थापकीय संचालकपदी

## सिडको नाट्यगृह मा. मुख्यमंत्री ना.श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते रसिकार्पण
## औरंगाबादकर ठरले एका अपूर्व सोहळयाचे साक्षीदार



‘या भव्य नाट्यगृहाची निर्मिती निर्देशित केलेल्या काळात पूर्ण करून, सिडकोने आपल्या कार्यक्षमतेला पुन्हा एकवार सिध्द केले आहे... आज अनेक नाट्यरसिकांच्या या अद्ययावत स्वप्नपूर्तीचे सारे श्रेय सिडको आणि सिडकोलाच!... शासनाच्या सांस्कृतिक संचलनालयाच्या धोरणानुसार नाट्यगृहाच्या निर्मितीसाठी फक्त चार कोटी रूपयांचा निधी उपलब्ध केला जातो, मात्र सिडकोने केलेली उर्वरीत वीस कोटी रकमेची तजविज आणि आवश्यक परिश्रमांनीच हे सुसज्ज नाट्यगृह उभे राहू शकले’, असे प्रतिपादन मुख्यमंत्री **मा. ना. श्री.विलासराव देशमुख** यांनी केले.

**दि. २१ नोव्हेंबर, २००८** रोजी नवीन औरंगाबाद, एन-५ येथे सिडकोने विकसित केलेल्या सिडको नाट्यगृहाचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री **मा.ना.श्री.विलासराव देशमुख** यांच्या शुभहस्ते झाले. त्याप्रसंगी त्यांनी सिडकोला उद्देशून वरील गौरवोद्गार काढले.

या उद्घाटन सोहळयाला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून औरंगाबादचे पालकमंत्री, सहकार, पुनर्वसन व मदतकार्य मंत्री, **मा.ना. श्री. पतंगराव कदम**, प्रमुख पाहूणे म्हणून सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील**, नगरविकास राज्यमंत्री **मा. ना. श्री. राजेश टोपे**, गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, दुरूस्ती व पुनर्बांधणी, खार जमीन व बंदरे राज्यमंत्री **मा. ना. श्री. प्रीतमकुमार शेगावकर,** सन्माननिय अतिथी म्हणून महापौर, औरंगाबाद **मा. श्रीमती विजया रहाटकर,** खासदार **मा. श्री. चंद्रकांत खैरे,** विधान परिषदेचे आमदार **मा.श्री. एम.एम. शेख, मा.श्री. विक्रम काळे, मा.श्री. किशनचंद तनवाणी, मा.श्री. सतिश चव्हाण,** विधानसभेचे आमदार **मा. श्री. राजेंद्र दर्डा, मा. डॉ. कल्याण काळे,** सिडकोचे संचालक **मा.श्री. नामदेव भगत,** तसेच नवीन औरंगाबाद एन-५ चे नगरसेवक **मा.श्री. अशोक विरकर** या मान्यवरांच्या उपस्थितीने शोभा आली.





# ऐतिहासिक औरंगाबादला सांस्कृतिक मानबिंदू अर्पण करून















# आणखी एका कलासंचितासह मानाचा मुजरा...















# सिडको











आपल्या भाषणात मा. मुख्यमंत्री म्हणाले की, 'सिडकोने नवीन औरंगाबाद येथील सर्व पायाभूत सेवा-सुविधांचे हस्तांतरण औरंगाबाद महानगर पालिकेकडे केले आहे, मात्र तरीही या प्रकल्पात आपले सर्वस्व ओतून सिडकोने जाता जाता औरंगाबादला सर्वोत्तम पार्टिंग गिफ्ट दिले आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाने बांधलेल्या या नाट्यगृहाची देखभाल सिडकोच चांगल्याप्रकारे करू शकते, त्यामुळे मी सिडको प्रशासनाला विनंती करेन की, पुढील किमान तीन महिने सिडकोने नाट्यगृहाच्या देखभालीची जबाबदारी स्वीकारावी व तदनंतरच ते महानगर पालिकेकडे सुपूर्द करावे.' यাप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी 'वऱ्हाड'कार **प्रा.श्री. लक्ष्मणराव देशपांडे** त्यांच्या अनुभवाधारे सिडको नाट्यगृहाची जगातल्या तुल्यबळ नाट्यगृहांशी तुलना करून हे नाट्यगृह त्यांतील सर्वोत्तम असल्याचा निर्वाळा दिला होता, याचा आपल्या भाषणात गौरवपूर्ण उल्लेख करून, **'डॉ. श्री. लक्ष्मणराव देशपांडे** यांनी दिलेलं प्रमाणपत्र सर्वांत मोठं आहे. आता कोणत्याही प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.' असं सांगून नाट्यगृहाच्या अद्वितियतेलाही दुजोरा दिला. सिडकोने नाट्यगृहाच्या निर्माण कार्यवाहीतही जी तत्परता दाखविली त्याचमुळे सिडकोची गणना सर्वोत्तम महामंडळात होत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. शिवाय नाट्यगृहाच्या वचनपूर्तीसाठी भाषणात ते म्हणाले की, सिडकोने औरंगाबादचा भौतिक विकास अप्रतिमरित्या साधला, आता नाट्यगृहाची निर्मिती करून नव्या कलासंस्कृतीच्या विकासाला चालना देण्याचे स्तुत्य काम सिडकोने केलेलं आहे.

**मा. ना. श्री. पतंगराव कदम** आपल्या अध्यक्षिय भाषणात म्हणाले की, 'औरंगाबाद देशातील टॉप टेन शहरांत समाविष्ट करण्यासाठी शासनाने राबविलेल्या धोरणांचा प्रवास इच्छितस्थळी जाताना दिसतो, हे या नाट्यगृहाच्या आश्वासनाच्या पूर्तीच्या रुपाने जाणवल्याशिवाय राहात नाही.' शिवाय सिडकोने घेतलेल्या परिश्रमांचाही त्यांनी मुक्तकंठाने गौरव केला.

सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील** यांनी प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेऊन, या प्रतिष्ठेच्या कामाला पूर्ण करण्याकरिता सिडकोने दिलेल्या प्राधान्यक्रमाविषयी सांगितले, एक























अद्ययावत वास्तू औरंगाबादकरांना दिल्याचे अतीव समाधान वाटत असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**मा.ना.श्री. राजेश टोपे** यांनी आपल्या शुभेच्छांत ही वास्तू मराठवाडयातील कलावंतांची घडणावळ ठरेल आणि महाराष्ट्रातील कलासंस्कृतीचा मानबिंदू ठरेल, असा विश्‍वास व्यक्त केला.

**मा.ना.श्री. प्रीतमकुमार शेगावकर** यांनी सिडकोने केलेल्या वेगवान कार्यवाहीचा गौरव करून, मराठवाडयाचे कलाजगत अधिक प्रगती साधू शकण्याची आशा निर्माण झाल्याचे सांगितले.

**मा. श्री. राजेंद्र दर्डा** म्हणाले की, नाट्यगृह पूर्तीचा मला आज अत्यानंद झाला आहे कारण अनेकांप्रमाणेच ही वास्तू माझेही स्वप्न होते व त्यात माझाही खारीचा वाटा असल्याचा अभिमान आहे. या नाट्यगृहाची कीर्ति अशी दिगंत व्हावी की, ज्याप्रमाणे प्रत्येक क्रिकेटपटूचे स्वप्न असते, आयुष्यात एकदा तरी क्रिकेट पंढरी लॉर्डस् मध्ये खेळावे, तसेच प्रत्येक कलावंताला एकदा तरी आपण सिडको नाट्यगृहात कला सादर करावी असे वाटेल अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या.

**मा. डॉ. कल्याण काळे** यांनी या वास्तूच्या रूपात कलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होण्याबरोबरच, औरंगाबादेत येणाऱ्या पर्यटकांना मनोरंजनाचे माध्यमही लाभले असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्तविकात उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी.एस. गिल्ल** यांनी मा. मुख्यमंत्री यांनी सिडकोला वारंवार केलेल्या सूचना-आदेशांमुळेच वेगाने कार्यवाही करण्याची प्रेरणा मिळाल्याचेही सांगितले. शिवाय मा. मुख्यमंत्री यांनी जी नाराजी व्यक्त केली, ती नाराजीच सिडकोला प्रोत्साहनाची ठरल्याचेही सांगून त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

या प्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी व सुपरिचित नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते व अभ्यासक **डॉ. श्री. लक्ष्मणराव देशपांडे** यांनी सर्वप्रथम आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या मनोगतात मराठवाड्याच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाचा पट श्रोत्यांना उलगडून दाखवला. महाराष्ट्रातील रंगभूमीला खऱ्या अर्थाने जगवणारे प्रमुख केंद्र असल्याचे प्रतिपादन करून त्यांनी मराठवाड्यातील कलावंताच्या योगदानाचा आढावा घेतला. त्यांच्या व्यासंगी मनोगतानं समारंभाच्या सुरूवातीलाच वैचारीक खोली मिळवून दिली. त्यांनी समारंभाच्या आरंभी दिलेला सिडको नाट्यगृह जगातील सर्वोत्तम नाटचगृह असल्याचा निर्वाळा सिडको परिवाराला आत्मविश्‍वास मिळवून देणारा ठरला, कारण खुद्द दस्तुर मा. मुख्यमंत्री यांनी त्यांच्या शब्दांना दुजोरा दिला.

औरंगाबादकरांना पर्वणी ठरलेल्या या सोहळ्याच्या उत्सव वास्तूत जसा कोऱ्या करकरीत पुस्तकाचा गंध दरवळतो तसा या वास्तूच्या नवथरपणाचा गंध जाणवत होता. सोहळयाकरिता हजर असणाऱ्या रसिकांना नाट्यगृहातील दोन भव्य पडद्यांवर बाहेरील घडोमोडींचे इत्यंभूत दर्शन घडविण्याची व्यवस्था होती. सनई चौघड्यांच्या मंजूळ तालात मा. मुख्यमंत्री आणि मान्यवरांना नाट्यगृहाच्या शिलान्यासाचे दर्शन रसिकांना घडत होते. मुख्य वास्तूत प्रवेश केल्यावर समस्त मान्यवरांना बहारदार फेटे बांधण्यात आले. स्थानिक कलावंतांनी सादर केलेल्या











**‘बहु असोत संपन्न कि महान’** या महाराष्ट्रगीताच्या लयदार पार्श्वभूमीवर मान्यवरांनी दीपप्रज्ज्वलन करून नाट्यगृहाचा कलारंभ झाल्याची नांदी दिली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय कथ्थक नृत्यांगणा **श्रीमती पार्वती दत्ता** यांचा पदन्यास साऱ्यांना नाट्यगृहात पुढील काळात घडणार असलेल्या कला घडामोडींची चुणूक दाखवून गेला. पार्वती दत्ता यांचा **महागामी गुरुकुल**चा संच या नाट्यगृहात कला सादरीकरण करणारी पहिली संस्था ठरली.

या रंगमंचावरील पहिले सादरीकरण जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे** यांच्या संकल्पनेतून संगित आणि नृत्याच्या मनोहारी समन्वयातून सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सिडकोचे मुख्य प्रशासन (न.श.) **श्री. मनोहर भगत** तर सूत्रसंचालन **प्रा. श्रीमती अनुया दळवी** यांनी केले. या प्रसंगी सिडकोचे माजी सहव्यस्थापकीय संचालक व राज्याचे परिवहन आयुक्त **श्री. दीपक कपूर,** विभागीय आयुक्त व मनपा आयुक्त **श्री. दिलिप बंड,** पोलिस आयुक्त **श्री. के. एल. बिष्णोई,** जिल्हाधिकारी **श्री. संजय कुमार जयस्वाल,** सिडको कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस **श्री. मिलिंद बागूल** तसेच वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, मराठवाडा नाट्च जगतातील कलावंत, नाटचप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते.

या भव्य नाटचगृहाचे काम निर्धारित कालावधित पूर्ण करण्यासाठी सिडकोचे मुख्य अभियंता व महाव्यवस्थापक (तांत्रिक) **श्री. एस. सी. देशपांडे,** अतिरिक्त मुख्य अभियंता-१ **श्री. ए. एन. महाजन,** अधिक्षक अभियंता **श्री. राजेंद्रसिंह सिसोदिया,** अधिक्षक अभियंता (विद्युत) **श्री. एस. आर. नाईक,** वरिष्ठ नियोजनकार **श्री. एन.एस. स्वामी,** सहयोगी नियोजनकार **श्री. वाय. एस. रेड्डी,** लेखाधिकारी **श्री. बी. एन. आठवले,** उद्यान अधिकारी **श्री. टी. आर. कांबळे,** जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे,** जनसंपर्क अधिकारी **श्री. दिलीप वाटाणे,** कार्यकारी अभियंता **श्री.एन. सी. बायस, श्री.बी.बी. नेमा, श्री.ए.बी. पवार, श्री. दीपक चव्हाण** तसेच सहाय्यक कार्यकारी अभियंता **श्री. घन:श्याम ठाकूर, श्री. झांजे, श्री. मोहिले, श्री. देशपांडे,** सहाय्यक नियोजनकार **श्री. मिथीलेश पाटील, श्री. अनमोल गायकवाड, श्री. राज वाघमारे** या चमूने पूर्ण तन्मयतेने केलेले परिश्रम सर्व मान्यवर, सिडको प्रशासन आणि औरंगाबादकरांच्या कौतुकाचा विषय ठरला आहे.

या देखण्या समारंभास यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य प्रशासक (नवीन शहरे) **श्री. मनोहर भगत** प्रशासक **श्रीमती मनिषा जायभाये-धुळे,** प्रकल्प समन्वयक व व्यवस्थापक (वसाहत-१) **श्री. विवेक मराठे**, जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे, डॉ. दिलीप वाटाणे,** श्री. जगदीश राठोड, श्री. पी. एस. चव्हाण, श्री. प्रमोद खर्चे, श्री. अनिल देवळाणकर, श्री. जे. एन. पाटील, श्री. राजा देशमाने, श्री.शेखर देशपांडे, श्री. गजानन साटोटे, श्री. श्रीधर इंगळे, श्रीमती यु. एस. ठाकूर, श्री. आर. डी. राठोड, श्री. डी. डी. वाकोडे, श्री. दादाराव दांडगे, श्रीमती कल्पना शिंदाडकर, श्रीमती व्ही. के. कमळस्कर, श्रीमती दिप्ती देशपांडे, श्रीमती जयश्री जोशी, श्री. के. बी. बागूल, श्री. सुनिल जाधव, श्री. अनिल शेरे, श्री. प्रभाकर भांबळे, श्री. विष्णू चितळे यांनी घेतलेले परिश्रम औरंगाबादकरांना एका अपूर्व सोहळ्याची पर्वणी देऊन गेले.








# सिडको नाट्यगृह, नवीन औरंगाबाद

कै. विष्णुदास भावे यांच्या नाट्यरोपणाच्या चिरस्मरणीय योगदानाला मानवंदना देण्याकरिता सिडकोनं यापूर्वी उभारलेलं वाशी, नवी मुंबई येथील 'कै. विष्णुदास भावे नाट्यगृह' आज नवी मुंबईतील कलारसिकांचे हृदयस्पंदन झाले आहे, तसेच मराठी रंगभूमीला मराठवाडा रंगभूमीने दिलेल्या अनमोल योगदानाला मानवंदना देण्यासाठी व पर्यायाने रसिकमनाचा कौल शिरसावंद्य मानून एक अद्ययावत सांस्कृतिक केंद्र सिडको औरंगाबाद येथे नाट्यगृहाच्या रूपात देत आहे.

नवीन औरंगाबादचे सिडको नाट्यगृह ६० फुट रुंदीच्या राज्यमार्गाजवळ असून, औरंगाबाद-जळगाव राज्य महामार्गाशी दोन स्वतंत्र रस्त्यांनी जोडले आहे. नाट्यगृहाचे वास्तुशिल्प सुप्रसिध्द वास्तुशास्त्रज्ञ **मे. हितेन सेठी** आणि असोसिएटस् यांनी रेखाटलेल्या आराखड्याबरहुकूम उभारले गेले आहे. अनेक वैशिष्ट्पूर्ण बाबींमुळे आगळे असलेले हे नाटयगृह अत्याधुनिक पध्दतीने परिपूर्ण आहे. तळमजल्यावर ९९४ व बाल्कनीतील १५६ आसने अशी एकूण ११५० प्रेक्षकांना सामावून घेण्याची क्षमता व २२० आसनांचे बहुद्देशिय सभागृह असणारे हे नाटयगृह संपूर्णत: वातानुकूलित आहे. याकरिता केंद्रीकृत वातानुकूलन यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. ५० × ३३ चौ.फुटांचा भव्य रंगमंच हे या नाटयगृहाचे खास आकर्षण ठरणार आहे. त्याचप्रमाणे अत्याधुनिक ध्वनीक्षेपण व प्रतिध्वनीरोधक यंत्रणा बसविण्यात आल्यामुळे कलावंतांच्या आवाजातील नैसर्गिक चढउतार सहजपणे शेवटच्या रांगेतील प्रेक्षकही विनाव्यत्यय श्रवण करू शकतील.

मोठे वाद्यवृंद, नृत्यनाटिका, संगीतसभा आदी कार्यक्रम सादर करण्यासाठी कसलीच कमतरता भासणार नाही अशा पध्दतीने या रंगमंचाची, ध्वनी व प्रकाशव्यवस्थेची योजना आखण्यात आली असून कलावंताच्या कलेची खरी गोडी येथे चाखायला मिळेल यात शंका नाही.

आगीपासून सुरक्षेसाठी स्वयंचलित अग्निसूचक यंत्रणाही येथे बसविण्यात आली आहे. विजपुरवठा खंडीत झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून शक्तिशाली 'विद्युत जनित्रा'ची सोय सुध्दा करण्यात आली आहे.



नाटय सादरीकरण आणि कार्यक्रमाच्या वेळी लहान मुलांचा त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या वेगळया 'क्रायरूम 'ची व्यवस्था येथे करण्यात आली आहे. प्रेक्षकगृहात बाहेरील आवाजाचा त्रास होऊ नये किंवा कार्यक्रमात व्यत्यय येऊ नये याकरिता भिंतीवर ध्वनिरोधक आच्छादन बसविण्यात आले आहे.

नाट्यगृहात कलावंताच्या वेशभूषेकरिता तीन स्वतंत्र व प्रशस्त वेशभूषा कक्षांची स्वच्छतागृहांसह व्यवस्था केली असून, अतिमहत्वाच्या व्यक्तींकरिता एक विशेष कक्षही राखून ठेवण्यात आला आहे.

७७७२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील ५५०५ चौ.मी. बांधीव क्षेत्रफळाची उभारण्यात आलेल्या ह्या भव्य वास्तूच्या निर्मितीसाठी झिंक ॲल्युमिनियमची तालुच्छत प्रणाली, बांधकामात वापरलेल्या पोलादावर आजचे सर्वोत्तम गंजप्रतिबंधक म्हणून गणले जाणारे 'झिंगा' नावाच्या कोटींगचे आवरण चढविण्यात आले आहे, फॉलसिलिंगकरिता जिप्सम बोर्डाचा वापर, सार्वजनिक वापराच्या क्षेत्राला ग्रॅनाईट व व्हॅट्रीफाईडची फरसबंदी अशा आधुनिक सामुग्री वापरल्याने ही इमारत सुबकतेबरोबरच वास्तूशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून नावाजली जाईल असा पुरेपूर विश्वास आहे. या इमारतीच्या दर्शनी भागाचे बांधकाम आवश्यक तेवढया प्रमाणात कर्टन वॉल्सच्या स्वरूपात सुशोभित करण्यात आले आहे. येथे बसविण्यात आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण रंगाच्या काचांमुळे इमारतीच्या मूळ सौंदर्यात भर पडली आहे. नाटयगृहाच्या प्रवेश कक्षात भरपूर नैसर्गिक प्रकाश राहील याची सोय करण्यात आली.

शिवाय बैठक व्यवस्थेकरिता 'ग्रेड स्लॅब', आरामदायी खुर्च्या, आकर्षक व अत्याधुनिक अंतर्गत सजावट, ठिकठिकाणी सुटसुटीत व रेखीव दिशादर्शक (मार्गदर्शक) सूचना फलक, अपंगांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहे, ऐसपैस व टापटिपीचे खाद्यस्टॉल्स, शिवाय मुख्य इमारतीच्या सभोवताली सुंदर बगीचा तयार करण्यात आला आहे. प्रेक्षकांच्या वाहनांसाठी नाटयगृह परिसरातच वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे, त्यात २०० दुचाकी व ८० चारचाकी वाहने राहू शकतील.

नवीन औरंगाबाद, सेक्टर-५ येथे उभारलेल्या या अत्यंत आकर्षक आणि अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण या इमारतीस उभारण्यास २३.५० कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत व त्यात ४.०० कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाने उपलब्ध केला आहे.

# नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय व्यापार मेळयात सिडकोच्या स्टॉलला उत्तम प्रतिसाद

नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा **दिनांक १४ ते २७ नोव्हेंबर २००८** या दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या मेळयात महाराष्ट्र पॅव्हीलियनमध्ये सिडकोने आपली भूमिका, ध्येय, पूर्ण केलेल्या उत्तुंग विकासकामांवर तसेच भविष्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे दर्शन घडविणारे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनकाळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री **मा.ना.श्री. विलासराव देशमुख,** उद्योग व सांस्कृतिक मंत्री **मा. ना. श्री. अशोक चव्हाण** यांच्यासह अनेक मान्यवरांनी आणि नागरिकांनी भेट दिली.




नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय व्यापार मेळयाचे उद्घाटन उपराष्ट्रपती **मा. श्री. एम.हमीद अन्सारी** यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्री **श्री. कमलनाथ** यांची प्रमुख उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यात ३२ देशांनी आपला सहभाग नोंदविला होता. यात प्रामुख्याने चीन, इंडोनेशिया, थायलंड, मॅनमार, मलेशिया, भूतान, श्रीलंका, अफगाणिस्तान, पाकिस्तान यांचा समावेश होता. त्याचबरोबर भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचाही मोठा सहभाग होता.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी.एस.गिल्ल** यांनी प्रदर्शनाला पहिल्याच दिवशी भेट घेऊन सिडकोच्या स्टॉलचे उदघाटन केले. सिडकोने आपल्या विविध प्रकल्पाची माहिती २५ पॅनल द्वारे प्रदर्शीत केली होती. यात नवी मुंबई येथील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक सोयीसुविधा, तसेच रस्ते, जलवाहतूक, रेल्वे वाहतूक या बद्दलची माहिती प्रदर्शीत करण्यात आली होती. नवी मुंबई येथील नियोजित खारघर हिल प्लॅट्यू प्रकल्प, इंटरनॅशनल डिप्लोमॅटीक एनक्लेव्ह, गोल्फकोर्स, छत्तीसगढ राज्याचे मुख्यालय रायपूरचा आराखडा इत्यादी प्रकल्पाची माहिती प्रदर्शीत करण्यात आली होती. नवीन औरंगाबाद, नवीन नाशिक, नवीन नांदेड, जालना व लातूर प्रकल्प तसेच चिखलदरा प्रकल्पाच्या माहितीचाही समावेश होता. ही माहिती पॅनलच्या माध्यमातून प्रदर्शीत करण्यात आली तर सिडकोने केलेल्या सर्वांगीण विकासाची माहिती चित्रफितीच्या रूपाने दाखविण्यात येत होती.



महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळातर्फे आयोजित महाराष्ट्र पॅव्हीलियन मध्ये एकूण ५० लघुउद्योजक, महिला बचत गट यांचा समावेश होता. त्याचबरोबर सिडको, एम.आय.डी.सी., मुंबई महानगरपालिका, एम.एम.आर. डी.ए. अशा दहा मोठया संस्थांनीही सहभाग घेतला होता. महाराष्ट्र पॅव्हीलियनचे उद्घाटन एम.एस.एस.आय.डी.सी.चे अध्यक्ष **श्री. अविनाश पांडे** यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी एम.एस.एस.आय. डी.सी.चे सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप गुट्टे** यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण भागातून आलेल्या महिला बचतगटांनी विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तूंना या प्रदर्शनात प्रचंड प्रतिसाद मिळाला. महिला सबलीकरण व पायाभूत सुविधा ही या वर्षीच्या प्रदर्शनाची मुख्य संकल्पना होती.

महाराष्ट्र पॅव्हीलियनमधील सिडकोच्या स्टॉलला एम.एम.आर. डी.ए. चे व्यवस्थापकीय संचालक **श्री. रत्नाकर गायकवाड,** एम.एस.एस.





आय.डी.सी.चे अध्यक्ष **श्री .अविनाश पांडे,** नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनचे आयुक्त **श्री. अभिताभ राजन, श्री. जे. पी. डांगे, श्री. भालचंद्र मुणगेकर,** जवाहलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष **श्री. एस. एस. हुसेन,** आदी मान्यवरांनी भेट दिली. त्याचबरोबर या प्रदर्शनातील सिडकोच्या स्टॉलला सुमारे चार लाख लोकांनी भेट दिली.

नवी दिल्ली येथील प्रगती मैदानात असलेल्या लाल चौकात २५ नोव्हेंबर रोजी 'महाराष्ट्र महोत्सव' साजरा करण्यात आला. या महोत्सवात कुलस्वामिनी- मुंबई तर्फे श्रीमती. माया जाधव यांनी लावणीनृत्य सादर करून प्रेक्षकांनी मने जिंकली. लावणी बरोबरच महाराष्ट्राच्या श्रमसंस्कृतीचा अविभाज्य भाग असणाऱ्या कलांचेही येथे प्रदर्शन करण्यात आले. दिल्लीकर प्रेक्षकांनी महाराष्ट्राच्या कलावंतांनी सादर केलेल्या शेतकरी नृत्य, कोळी नृत्य, जोगवा, वासुदेव नृत्य, इत्यादी नृत्यप्रकारांना टाळयांच्या कडकडाटात प्रतिसाद देऊन अवघा परिसर दणाणून टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रवेशाचे सादरीकरण करून मान्यवर आणि


















उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास राज्याचे उद्योग व सांस्कृतिक मंत्री **ना.श्री. अशोक चव्हाण,** नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनचे आयुक्त **श्री. अभिताभ राजन, श्री. जे.पी.डांगे,** एम.एस.एस.आय.डी.सी.चे सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप गुट्टे** आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनात सिडकोचे जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे** यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या सिडको स्टॉलला भेट देणाऱ्या मान्यवरांना व नागरिकांना उत्कृष्ट दालन आणि स्वयंस्पष्ट माहीती फलक तसेच एकूण सजावटीची वाखाणणी केली. सिडकोच्या वतीने जनसंपर्क अधिकारी **डॉ. दिलीप वाटाणे** व कार्यालयीन सहाय्यक **श्री. मनोहर कोळी** माहिती देत होते. तसेच स्टॉलवर स्वागतिका महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील **कु. प्राजक्ता दिलीप नाक्षणे** यांनी काम पाहिले. हे प्रदर्शन व यशस्वी करण्याकरिता सिडकोचे अधिकारी व कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.














# Ex. President Hon. Dr. A. P. J. Abdul Kalam consulted for Science Park project



City and Industrial Development Corporation of Maharashtra (CIDCO) is planning to come up with state of the art 'Science Park' at Navi Mumbai. To discuss the project, Vice Chairman & Managing Director, **Mr. G. S. Gill,** along with Senior Planner (C) **Mr. Ramesh N. Dengle** had a meeting with the Hon. Ex-President of India, **Dr. A. P. J. Abdul Kalam** at his residence at New Delhi on 6th November, 2008.

Mr. Gill expressed his thanks to Dr. Kalam for sparing his valuable time for the meeting. The context of the project, starting from the Mumbai Metropolitan Region to the project area, along with the actual photographs of the site and the efforts taken till date were explained. Mr. Gill gave the details of the methodology to be used in bringing up this project to Dr. Kalam and also requested him to be a patron of the project.

Dr. Kalam advised to visit science parks at Kolkata, Ahmedabad, Kuala Lumpur and Singapore. Hon'ble ex. President stressed that Science Parks play an important role of igniting young minds. He not only expressed his happiness about the selection of the site, but also assured to advise and interact with various professionals whenever required and guide the project.

# विशेष वैद्यकीय देयके : इंटरनेट आधारित सॉफ्टवेअर कार्यान्वित





दि. ४ नोव्हेंबर २००८ रोजी सिडको कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुविधेसाठी आणि कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत प्रतिपूर्ती करण्यात येणाऱ्या विशेष वैद्यकीय देयकांसंदर्भातील इंटरनेट आधारित सॉफ्टवेअरचे उद्घाटन उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांच्या हस्ते संपन्न झाले.

या वेळी मनोगत व्यक्त करतांना **श्री. जी.एस. गिल्ल** म्हणाले की 'या सॉफ्टवेअरमुळे कार्यवाही दृत्गतीने होऊन, अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयके प्रतिपूर्ती वेगाने प्राप्त होतील, न्यायिक देयकांचे अदाकरण शीघ्रतेनं करणे सुलभ होईल, शिवाय संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकपणा आणणेही साध्य होईल. या माध्यमाचा एक अन्य उपयुक्त लाभ म्हणजे अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांचा वैद्यकीय तपशील देखील आवश्यकता असेल तेव्हा उपलब्ध होईल'

या प्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दीपक कपूर,** यांनीही मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, संगणकीकरणामुळे सिडको सभासदांचा वैद्यकीय तपशिल संकलित करता येईल आणि तो डिजिटल स्वरुपात असल्यामुळे कार्यवाहीत पारदर्शकता येईल.

चिफ इन्फोटेकचे **श्री. के. के. मजूमदार** यांनी या प्रसंगी उपयोगात आणण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीबद्दल प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली आणि आवश्यकतेनुसार बदल करून प्रणाली परिपूर्ण करण्यात येईल असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी संगणक व्यवस्थापन प्रणाली (सॉफ्टवेअर) विकसित करणारे चिक् इन्फोटेकच्या **श्री. के. के. मजूमदार** व **श्री. हिमांशू शेखर** यांचा सत्कार **श्री. जी. एस. गिल्ल** यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे** यांनी केले. याप्रसंगी विविध संघटनांचे पदाधिकारी, सिडकोचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संगणकीय प्रणालीद्वारे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा वैद्यकिय तपशिल संकलित करता येईल. तसेच आर्थिक वर्षात प्रत्येक कर्मचारी आणि कुटुंबियांच्या वैद्यकिय उपचारांवर किती खर्च झाला याची नोंद घेता येईल. तसेच व्यक्तिनिहाय आजारांचा इतिहास आणि भविष्यातील उपाययोजना याबाबतही अंदाज घेता येईल. प्रामुख्याने आरोग्यविषयक जाणिव या माध्यमातून अधिक प्रगल्भ होईल.





## श्री.श्यामसुंदर शिंदे सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी



**श्री. श्यामसुंदर शिंदे** यांनी दि. ५ नोव्हेंबर, २००८ रोजी सिडकोच्या नवी मुंबई येथील मुख्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक या पदाचा पदभार स्वीकारला.

मावळते सहव्यवस्थापकीय संचालक **श्री.दीपक कपूर** यांची परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य म्हणून नियुक्ती झाली आहे व त्यांच्या रिक्त जागी श्री. श्यामसुंदर शिंदे यांची नियुक्त करण्यात आली आहे. श्री. शिंदे हे भारतीय प्रशासकीय सेवेतील (भा.प्र.से.) १९९१ सालच्या तुकडीचे अधिकारी आहेत. त्यांनी कृषीशाखेतील पदव्युत्तर पदवी मिळवली असून, प्रशासकीय सेवेतील कामकाजाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. सिडको महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी श्री.श्यामसुंदर शिंदे हे परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी जिल्हाधिकारी रायगड, मुख्याधिकारी म्हाडा अशी महत्वपूर्ण पदे भुषविली आहेत.







## श्री. दीपक कपूर यांना स्नेहपूर्ण निरोप



दि. १२ नोव्हेंबर, २००८ रोजी **श्री.दीपक कपूर** यांच्या निरोप सोहळयाचे व सिडकोचे नवे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून पदभार स्वीकारणारे **श्री.श्यामसुंदर शिंदे** यांच्या स्वागत सोहळयाचे आयोजन किल्ले गावठाण, बेलापूर येथील विश्राम गृहात करण्यात आले होते.

या प्रसंगी सिडकोच्या दोन्ही आजी-माजी सहव्यवस्थापकीय संचालकांनी आपल्या सहकाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधून छोटेखाणी भाषणांद्वारे आपले मनोगतही व्यक्त केले. या प्रसंगी व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांनी आपल्या मनोगताद्वारे उभयतांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. तसेच सिडकोचे संचालक **मा. श्री. नामदेव भगत,** व्यवस्थापक (पणन-१) **श्री. आर. जी. मोरे,** अतिरिक्त भूमि व भूमापन अधिकारी **श्री. माणिक मुंडे** मुख्य अभियंता तथा महाव्यवस्थापक (तांत्रिक) **श्री. सतिश देशपांडे,** मुख्य वास्तुतज्ज्ञ व नियोजनकार **श्री. दिलिप शेकदार** यांनीही मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन **श्री. दीपक कपूर** यांचा सन्मान करण्यात आला व त्यांना 'दि प्रॉफेट, अँड दी आर्ट ऑफ पीस' हे त्यांचे आवडते पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी **श्री. मोहन निनावे** यांनी केले.

या सोहळयाला सिडकोचे विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी वर्गाची उपस्थिती लाभली.

## कांगा लिग स्पर्धेत श्री. राजेश पाटील यांची अविस्मरणीय कामगिरी



डॉ.डी.एच.कांगा लीग स्पर्धेत सिडको क्रिकेट संघाचे कर्णधार **श्री. राजेश पाटील** यांनी नवरोज क्रिकेट क्लब मधून खेळताना गोलंदाजीत अविस्मरणीय कामगिरीची नोंद केली.

आझाद मैदानात खेळल्या गेलेल्या सामन्यात त्यांनी पाच खेळाडूंना तंबूचा रस्ता दाखवून प्रतिस्पर्धी संघाला खिंडार पाडले. **१०-२-२०-५** ही त्यांच्या गोलंदाजीची कामगिरी सर्वत्र कौतुकाचा विषय झाली आहे. विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून त्यांनी वेळोवेळी चमक दाखविली आहे. त्यांच्या या यशाला व पुढील वाटचालीला सिडको परिवाराच्या शुभेच्छा.

## सहावा वेतन आयोग : सुधारित वेतनश्रेणाचा पहिला टप्पा लागू

सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीचा एक टप्पा म्हणून, सिडको कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या दुप्पट किंवा **रु. १०,०००/-** यांच्या पैकी जी जास्त भरणारी असेल रक्कम असेल ती मंजूर करण्याच्या प्रस्तावाला प्रशासनाने मान्यता दिली असून सदर रक्कम सिडको कर्मचाऱ्यांच्या नोव्हेंबर महिन्याच्या पगारात वर्ग करण्यात आली आहे.

सिडकोच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या मागणी करीता सहकार्य केल्याबद्दल सिडको कर्मचारी संघटनेप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** व सरचिटणीस **श्री. मिलिंद बागूल** यांनी संघटनेच्या वतीने सिडको प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## सिडको कर्मचाऱ्यांच्या वाहन कर्ज व किरकोळ कर्जवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी

सिडको कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वाहन कर्ज व किरकोळ कर्जवाढीच्या प्रस्तावाला संचालक मंडळाच्या दि. १० ऑक्टोबर २००८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दुचाकी वाहनांत, स्कूटर खरेदीकरिता तिच्या मूळ किमतीच्या ८५% किंवा रु. ३५,०००/- यांपैकी जी रक्कम जास्त भरणारी असेल ती, तर मोटर सायकल खरेदीकरिता तिच्या मूळ किमतीच्या ८५% किंवा रु. ५५,०००/- यांपैकी जी रक्कम जास्त भरणारी असेल ती मंजूर करण्यात येईल.

तसेच किरकोळ कर्ज रक्कमवाढीच्या प्रस्तावानुसार रु.३०,०००/- ते रु. ५०,०००/- इतकी वाढ देण्यात आली.

६० मासिक हप्त्यांत वसूल करण्यात येणाऱ्या सदर दोन्ही रकमांवर, वाहन कर्जाकरिता ११.५% आणि किरकोळ कर्जाकरिता ११% व्याज आकारण्यात येईल. सदर प्रस्ताव दि. १ नोव्हेंबर २००८ पासून अंमलात आणण्यात येत आहे. व्यवस्थापनाच्या या निर्णयाबद्दल सिडको कर्मचारी संघटनेने आभार व्यक्त केले आहेत.

## शिपाई व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना 'टंकलेखक' पदावर पदोन्नती जाहीर

सिडकोला ज्या शिपाई व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याची गेल्या पंधरा ते वीस वर्षांच्या कालावधीपासून सेवा लाभली आहे व त्यांना आवश्यक ती शैक्षणिक पात्रताही लाभली आहे, अशा शिपाई व चतुर्थ श्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार **'लिपिक-टंकलेखक'** पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सिडको कर्मचारी संघटनेने सदर विषयाबाबत सिडको प्रशासनाकडे पाठपुरावा करून मान्यतेची मोहोर उमटवल्याने **सिडको कर्मचारी संघटनेने** समाधान व्यक्त करुन आभार मानले आहेत. सर्व पदोन्नती प्राप्त कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.

## नियुक्ती व पदोन्नती

सिडको महामंडळात नोव्हेंबर २००८ मध्ये पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती / नियुक्ती करण्यात आली आहे.

**पदोन्नती:** **श्री. एस. के. कदम** यांना **अधिक्षक अभियंता, श्री. अे. जी. माने** यांना **कार्यकारी अभियंता** म्हणून **श्री. पी. पी. गहिरवाल** यांना **सहा. कार्यकारी अभियंता, श्री. अे. एस. म्हसकर, श्री. अे. के. घाडी, सौ. आर. आर. पाटील, श्री. जे. डी. उदेग, श्री. पी. डी. पाटील, श्री. एस. एम. शारकर, श्री. एस. जे. भगत, कुमारी पी. व्ही. म्हात्रे, श्री. के. एस. कोळी, श्री. एस. एस. कोळी, श्री. जी. के. कडू, श्रीमती आर. एम. सानप, श्री. एस. एन. आंब्रे, श्री. पी. एस. भांबळे, जगदीश के. पाटील, श्रीमती पी. एस. जाधव** यांना लिपिक/टंकलेखक म्हणून पदोन्नती देण्यात आली.

**नियुक्ती:** **कु. कीर्ति सुनील पाटील, कु. सोनाली आर. गोरे, कु. चेतना आर. चव्हाण** यांची **सहाय्यक अभियंता** म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्ती व पदोन्नती प्राप्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## निरोप समारंभ



श्री. शहाजी लिंगराम भोसले



श्री. ज्ञानबा नामदेव मोरे



श्री. गजानन हिरा म्हात्रे

**श्री. शहाजी लिंगराम भोसले** (भूमी अधिकारी), **श्री. ज्ञानबा नामदेव मोरे** (तांत्रिक सहाय्यक) व **श्री. गजानन हिरा म्हात्रे** (शिपाई) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३० नोव्हेंबर, २००८ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



**संपादक, मुद्रक व प्रकाशक: मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).**
**या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.**